लोकमत

Ashokrao Mane College of Pharmacy
Peth-Vadgaon, Dist. Kolhapur
Estd. 2006



पाडळी (ता. हातकणंगले) येथे पेठवडगावच्या अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी श्रमसंस्कार शिबिरार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबविले.

# पाडळीत श्रमसंस्कार शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

नवे पारगाव : पाडळी (ता. हातकणंगले) येथे अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी पेठवडगाव अंतर्गत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन सरपंच दिलीप पोवार यांच्या हस्ते झाले.

उपसरपंच अभिनंदन जाधव, प्रा. व्ही. बी. पाटील, धनंजय देसाई, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. ए. आचलारे, डॉ. बिभाराणी पाटील, माणिक पाटील उपस्थित होते. श्रमसंस्कार शिबिर ही काळाची गरज आहे. श्रमसंस्कार शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी काम करण्याची प्रवृत्ती निर्माण होते, असे प्रतिपादन सरपंच दिलीप पोवार यांनी केले. श्रमसंस्कार शिबिरार्थ्यांनी गावातील कचरा गोळा करून त्याची होळी केली. संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह माने, कार्याध्यक्ष विकासराव माने आणि शिबिरार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. ए. आचलारे यांनी सूत्रसंचालन केले.

Hello Kolhapur
Page No. 9 Mar 13, 2018
Powered by: erelego.com